**प्रेसनोट दि.०८/०५/२०१९**

**कोथरूड पोलीस ठाणे पुणे**

**कोथरूड पोलीस ठाणे हद्दीत बांदल कॉम्पलेक्स पौड रोड येथे सीसीटीव्ही बसविलेबाबत**

मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे आम्ही वेळोवेळी पोलीस ठाणे हद्दीतील वेगवेगळया सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी व इतर पदाधिकारी यांच्या बैठका घेवून सुरक्षिततेच्या दृष्टीने सोसायटीमध्ये जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत अवाहन केले होते.

त्यानुसार श्री दत्तात्रय मनियार सेक्रेटरी, बांदल कॉम्पलेक्स, डावी भुसारी कॉलनी पौड रोड, कोथरूड पुणे यांनी व नमूद सोसायटीचे इतर पदाधिकारी यांनी त्यांचे सोसायटी व मुख्य रोड परिसरामध्ये चांगल्या प्रतीचे ८ नाईट व्हीजन सीसीटीव्ही कॅमेरे, १५ दिवसाने बॅकअपसह बसवून पोलीसांचे आवाहनाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद देवून सहकार्य केले आहे.

अशा प्रकारे कोथरूड पोलीस ठाणे हद्दीत मा. पोलीस आयुक्त पुणे शहर, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, मा पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ पुणे शहर यांचे सुचनांप्रमाणे केलेल्या अवाहनाप्रमाणे बांदल कॉम्पलेक्स, पौड रोड कोथरूड पुणे येथे सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसवून पोलीसांना सहकार्य केले आहे.

(प्रतिभा जोशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे पुणे



